महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (व्यवस्थापन अधिनियम),
१९७६ प्रशासक नियुक्ती कार्यपध्दतीबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
शासन निर्णय, क्रमांक माशाव्य-२०१२/(८८/२०१२)/माशि-३.
दिनांक - १५ ऑक्टोबर, २०१२.

**प्रस्तावना**

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असल्याने महाराष्ट्र शासनाने सर्व दूरवर प्राथमिक व माध्यमिक शाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनामार्फत सध्या सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु असून त्यात सुमारे १.८० कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या १ लाख शाळांपैकी सुमारे ३२५७३ शाळा खाजगी आहेत. (अनुदानित २०,४५५, विना अनुदानित १२,०१८)

२. खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविल्या जाणा-या शाळांमध्ये मुलांना योग्य व दर्जदार शिक्षण मिळावे यासाठी शासनाने महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (व्यवस्थापन) अधिनियम, १९७६ (यानंतर अधिनियम, १९७६) पारीत केला असून यात शाळा जर व्यवस्थित चालत नसतील तर त्यांचे व्यवस्थापन ताब्यात घेण्याची तरतूद करण्यात आली आहे. अधिनियम १९७६ चे कलम ३ (१) खालीलप्रमाणे आहे :

> **Whenever the Director is satisfied that the Management of any educational institution has neglected to perform any of the duties imposed on it by or any instrument (including any rules, regulations or bylaws) which regulates its administration or is being managed in a manner detrimental to public interest, and that it is expedient in the public interest, and in particular, in the interest of education imparted in such institution to take over the management of such institution in so**

far its activity; relates to imparting education, he may, not with standing anything contained in any law for the time being in force after giving the management of such institution , a reasonable opportunity of showing cause against the proposed action, by an order take over the management of such institution in so far as its activity; relates to imparting education specified in the order for a limited period not exceeding three years.

३. वरील तरतूदीच्या अनुषंगाने खाजगी शाळांवर आवश्यक त्या वेळी प्रशासक नेमण्यात येतो. प्रशासक नेमताना खालील प्रकारची पध्दती अवलंबिली जाते :-

(I) शाळांविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यावर, शिक्षण संचालक सुनावणी घेऊन अधिनियम १९७६ चे कलम ३ (१) प्रमाणे प्रशासक नियुक्तीचा निर्णय घेतात.

(II) यानंतर शिक्षण संचालक प्रशासक व सल्लागार समितीसाठी नावांची शिफारस राज्य शासनाकडे करतात. शासन सर्व बाबींचा विचार करुन नावांना मंजूरी देते.

(III) यानंतर जर संस्थेच्या व्यवस्थापनाने अधिनियम १९७६ चे कलम ३ (४) अन्वये शासनाकडे अपील दाखल केले तर सदर अपीलावर शासन स्तरावर सुनावणी घेऊन योग्य तो निर्णय दिला जातो.

४. शासनाद्वारे अनुसरण्यात येणारी वरील पध्दती अधिनियम १९७६ मधील विहित तरतूदीप्रमाणे नाही अशा प्रकारच्या तक्रारी शासनाकडे आल्या आहेत. कायदयातील तरतूदीवरुन असे दिसते की, सर्वसाधारणपणे प्रशासक नेमता येत नाही. मात्र विशेष परिस्थितीमध्येच प्रशासक नेमण्याचे अधिकार आहेत. शाळा व्यवस्थापनाचा कारभार सार्वजनिक प्रामुख्याने शैक्षणिक हिताच्या विरोधात असेल किंवा शाळा व्यवस्थापन प्रचलित कायदे व नियमाच्या तरतूदीप्रमाणे काम करीत नसेल तरच शिक्षण संचालकांना प्रशासक नेमण्याचे अधिकार आहेत. शिक्षण संचालक यांनी आतापर्यंत पारीत केलेले बरेचसे आदेश पाहता असे दिसून येते की, आदेश अत्यंत त्रोटक असून त्यात कसलेही विश्लेषण, कारणमिमांसा नमूद करण्यात येत नाही, पुरावे विचारात घेतले जात नाहीत. काही प्रकरणी शाळांचा निकाल चांगला असूनसुध्दा प्रशासक नेमण्यात आला आहे.

५. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ , नागपूर यांनी न्यायालयीन याचिका क्र. १३३२/२००९ मध्ये दिनांक २६ मार्च, २००९ रोजी प्रशासक नेमण्याबाबत खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

**(I) Whenever the Director is satisfied that management of educational institution is required to be taken over in view of contingencies mentioned in Section 3 (1) he has to pass an order to that effect of taking over of the management-**

**(II) The Management which is aggrieved by the order of Director of taking over management has a right of appeal to the State Government within fifteen days from the date of receipt of such order u/s.3 (4) of the Act of 1976.**

**(III) The Director is required to issue order of appointment of Administrator with the approval of the State Government to manage the educational institution taken over u/s. 3 (1) of the Act of 1976**

६. अधिनियम १९७६ च्या तरतूदी व मा.उच्च न्यायालयाचे आदेश लक्षात घेता प्रशासक नियुक्तीच्या कार्यपध्दतीत बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## शासन निर्णय -

(१) शिक्षण संचालक यांनी अधिनियम १९७६ चे कलम ३ (१) अन्वये सर्व पुराव्याची शहनिशा करुन बोलके आदेश (Speaking order) पारीत करावे व सर्व संबंधितांना लेखी कळवावे. आदेश पारीत करीत असताना कलम ३ (१) ची तरतूद कशी पूर्ण होते, हे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक राहील.

(२) प्रशासक नेमण्याचे आदेश पारीत झाल्यावर शाळा व्यवस्थापन यांना वरिष्ठांकडे (शासन स्तरावर) अपील दाखल करण्याचे अधिकार आहेत. म्हणून संचालकाचे आदेश प्राप्त झाल्यावर शाळा व्यवस्थापनास नियमाप्रमाणे अपील करण्यासाठी कमीतकमी १५ दिवसाची मुदत देणे क्रमप्राप्त आहे.

(३) शाळा व्यवस्थापनाने शासनाकडे अपील दाखल केल्याचर शासन त्याबाबतीत सुनावणी घेऊन योग्य ते आदेश पारित करेल.

(४) शाळा व्यवस्थापनाने नियमाप्रमाणे विहित मुदतीत अपील दाखल केले नाही किंवा शासन स्तरावर एकदा अपील फेटाळण्यात आले तर अशा परिस्थितीत शिक्षणसंचालकांनी व्यक्ती विशेष म्हणून प्रशासक व सल्लागार सदस्य नेमण्याबाबत शासनाकडे नावाची शिफारस करावी.

(५) शिक्षण संचालकांनी अधिनियम, १९७६ चे कलम-३ ( १) अन्वये प्रशासक नेमण्याचे आदेश पारीत करताना "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९" मधील तरतूदीचा सर्वकष विचार करावा.

(६) गत तीन वर्षात शाळेची तपासणी झालेली नसल्यास किंवा शाळेच्या तपासणीमध्ये त्रुटी आढळून आल्या असतानाही कोणतीही कारवाई न केल्यास किंवा शाळेच्या तपासणीमध्ये त्रुटी आढळल्या नसतानाही प्रशासक नियुक्तीच्या त्रुटी उपस्थित केल्यास संबंधित निरिक्षण अधिका-यांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१२१०१२१४३५५४११२१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(संतोष आगळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. मंत्री / मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,यांचे खाजगी सचिव.
मा. अपर मुख्य सचिव, यांचे स्वीय सहायक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्य. व उच्च माध्य.) महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षण परिषद, मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद,
कार्यासन प्राशि-३ / माशि-३ संग्रहार्थ / निवडनस्ती.